# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेसनोट क्रमांक ३१६/२०२४ दिनांक- १९/०८/२०२४.

## “वालीव पोलीस ठाणे मध्ये दाखल गुन्हयातील अपहरीत मुलीचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना यश”

वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ७०५/२०१९ भा.दं.वि.स.कलम ३६३, ३७० मधील अपहरीत मुलगी नामे कु.रुबी दिनानाथ शर्मा वय १४ वर्षे हीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी अमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेले म्हणुन दि.२६/०६/२०१९ रोजी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यानंतर दि.०२/०२/२०२३ रोजी सदरचा गुन्हा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक शाखा,नालासोपारा यांचेकडे वर्ग केला आहे. मा.पोलीस उप-आयुक्त(गुन्हे) सो व मा.सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे) मि.भा.व.वि. यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास पोनि/सौरभी पवार करीत आहेत.

गुन्हयातील प्राप्त मोबाईलचे कॉल्स डिटेल्सचे तांत्रिक विश्लेषन करुन सदर अपहरीत मुलगी ही गुजराज राज्यातील सुरत येथील उन पाटीया, भेडी बाजार रोडवर असल्याचे निष्पन्न होत असल्याने पोनि/सौरभी पवार मॅडम यांनी दि.०८/०८/२०२४ रोजी सहा.फौजदार गवई व दोन महीला पोलीस अंमलदार नामे १) मपोहवा/सुप्रिया तिवले व मपोशि/काजल पाटील यांना सुरत येथे आदेश देवुन रवाना केले. सदर पोलीस स्टाफ सुरत येथे जावुन तीचा शोध घेवुन अपहरीत मुलगी नामे .रुबी दिनानाथ शर्मा वय २५ वर्षे रा.प्लॉट नं.८६, सलीम नगर,भेंडी बाजार रोड, उन-सुरत, राज्य-गुजरात ही तिचे रहाते घरी मिळुन आल्याने तिस ताब्यात घेण्यात अनैतिक मानवी वाहतुक शाखा,नालासोपारा यांना यश आले आहे.

सदरचा गुन्हा हा वालीव पोलीस ठाणे येथे नोंद असुन पोलीस ठाणे विभाजनानंतर सदरचा गुन्हा हा पेल्हार पोलीस ठाणे येथे वर्ग केल्याचे निदर्शनास आल्याने अपहरीत मुलीस पुढील कार्यवाही करीता वरीष्ठारंच्या आदेशान्वये पेल्हार पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले.सदर गुन्हयाचे अपहरीत मुलगी व इतर साक्षीदार यांचे मोबाईलचे कॉल डिटेल्स व लोकेशनसाठी सफौ/संतोष चव्हाण नेमणुक सायबर विभाग गुन्हे शाखा मि.भा.व.वि.यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

सदरचा तपास हा पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांचे आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार यांनी उत्कृष्ठरित्या केला आहे.

**----------0000---------**